## दोन महिन्यांत केवळ १५ तक्रारी.. नांदा सौख्यभरे..!!

# ठाण्यातील नवरे बनले प्रेमळ... बायका समंजस

ठाणे, दि. १३ (प्रतिनिधी) - कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे घरात बसलेले नवरे छळतायत, अशा तक्रारींचा पाढा जगभरातील बायकांनी सोशल मीडियावरून जाहीरपणे वाचला.. पण या लॉकडाऊनमध्ये ठाण्यातील नवरे खरोखर प्रेमळ झालेत आणि बायकाही प्रचंड समंजस झाल्याचा धडधडीत पुरावाच हाती आला आहे. नोकरी आणि करियरच्या धबडग्यात कमी झालेला संवाद आणि प्रेम लॉकडाऊनच्या काळात चक्क वाढले आहे. एरवी दर महिन्याला कौटुंबिक हिंसाचाराच्या १८०० तक्रारींचा पाऊस पडायचा, पण आता ठाण्यातून दोन महिन्यांत अवघ्या १५ तक्रारी आल्या.. तेव्हा लगे रहो... नांदा सौख्यभरे..!!

### लॉकडाऊन इफेक्ट
### प्रेम वाढले, कौटुंबिक हिंसाचार घटला

लॉकडाऊन सुरू झाले आणि त्याबरोबरच वर्क फ्रॉम होमही.. आता नवरोबांच्या चटकमटक खाण्याच्या फर्माईशीही सुटणार.. आणि बायकांची काने वाढणार.. आधीच ऑफिसच्या कामाचे टेन्शन, त्यात कटकटी विकोपाला जाणार ही भीती ठाणे जिल्ह्यातील दाम्पत्यांनी साफ फोल ठरवली आहे. राज्य महिला आयोग आणि पोद्दार फाऊंडेशनच्या माध्यमातून कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी चालवण्यात आलेल्या हेल्पलाइनवर रोज साधारण ६० म्हणजेच महिन्याला १८०० तर दोन महिन्याला ३६०० तक्रारींची नोंद होते. पण लॉकडाऊनच्या दोन महिन्यांच्या काळात या हेल्पलाइनवर अवघ्या १५ तक्रारींची नोंद झाल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या सदस्या आशा लुथरा यांनी दिली. लॉकडाऊनच्या काळात खरं तर ताण-तणाव, चिडचिड होणे असे त्रास होतात. पण ठाणेकर नवरा-बायकोत होत असलेले हे बदल अच्छे है..!! अशी कौतुकाची थाप लुथरा यांनी दिली.



### ही आहे हेल्पलाइन

राज्य महिला आयोगाची १८००१२१०९८० हीच हेल्पलाईन असून याच नंबरवर रोज ५० ते ६० तक्रारी येतात. मात्र तक्रारी घटल्याने सध्या ही हेल्पलाइन शांत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गुजराती या चार भाषेत सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत या हेल्पलाईनवर संपर्क साधता येतो. समुपदेशक विनामूल्य मार्गदर्शन करतात.

### दारुबंदी पथ्यावर...

पती-पत्नीमध्ये दारु पिण्यावरुन होणाऱ्या वादाचे प्रमाण अधिक असते. पोलिस ठाण्यात अशा तक्रारी पूर्वी दररोज नोंदवल्या जात. मात्र आता लॉकडाऊनच्या काळात दारु विक्रीच बंद असल्याने अशा तक्रारी येण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

**- संजय गायकवाड**, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वर्तकनगर पोलीस ठाणे

### पोलिसांना त्रास नको म्हणून..

एका महिलेचा पतीसोबत वाद झाला. तिने हेल्पलाइनवर फोन केला. तिचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पोलिसांची मदत मिळवून देते असे समुपदेशक आशा गणगे यांनी सांगताच लॉकडाऊनमध्ये पोलीस प्रत्येक आघाडीवर लढताहेत.. त्यांना त्रास नको.. मी पुन्हा नवऱ्यासोबत बोलण्याचा प्रयत्न करते, अशी भूमिका त्या महिलेने घेतल्याची माहिती गणगे यांनी दिली.